माथाडी हॉस्पिटल (ट्रस्ट) चे लाभ सर्व माथाडी कामगारांना देणेबाबत तसेच हॉस्पिटलच्या कामकाजाबाबत चौकशी करण्यासाठी समिती गठीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्र. युडब्ल्युए-२०१८/प्र.क्र.८७०/कामगार-५
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:-२६ फेब्रुवारी, २०१९.

वाचा:- शासन निर्णय क्र.युडब्ल्युए-२०१८/प्र.क्र.८७०/कामगार-५, दि.०३ जानेवारी,२०१९

प्रस्तावना :-

महाराष्ट्र विधानमंडळाच्या सन २०१८ च्या हिवाळी अधिवेशनामध्ये लक्षवेधी सूचनेद्वारे उपस्थित झालेल्या विषयाच्या अनुषंगाने माथाडी हॉस्पिटल (ट्रस्ट) संदर्भात उच्च स्तरावरुन चौकशी करण्याचे आदेश देण्यात येतील, असे शासनातर्फे उत्तर देण्यात आले आहे. लक्षवेधी सूचना विधान परिषद सभागृहात चर्चेस घेण्यात आली असता, चर्चेदरम्यान मा.मंत्री (कामगार) यांनी माथाडी हॉस्पिटल (ट्रस्ट) च्या कामकाजाबाबत प्रधान सचिव (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करुन चौकशी करण्यात येईल, असे आश्वासन सन्माननीय विधान परिषद सदस्य यांनी विचारलेल्या प्रश्नावर दिलेले आहे. विधान परिषद सभागृहात देण्यात आलेल्या आश्वासनानुसार पुढील कार्यवाही करण्यासाठी प्रधान सचिव (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली संदर्भाधीन दि.०३/०१/२०१९ रोजीच्या शासन निर्णयाने समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समिती सदस्य रचनेत मध्ये धर्मादाय आयुक्त यांना प्रशासकी कार्यबाहुल्याचा व्याप पाहता वेळोवेळी बैठकीत उपस्थित रहाणे शक्य नसल्यामुळे त्या ऐवजी धर्मादाय आयुक्त यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी व सार्वजनिक आरोग्य विभागाने प्राधिकृत केलेल्या अधिकारी यांचे नांव “सदस्य” म्हणून समावेश करण्याची बाब विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

दि.०३/०१/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रधान सचिव (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या "समिती सदस्य" "धर्मादाय आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी" या ऐवजी अ.क्र.(२) मध्ये धर्मादाय आयुक्त यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांना "सदस्य" करण्यात येत आहे.

तसेच अ.क्र.(४) रचनेमधील "प्रधान सचिव (सार्वजनिक आरोग्य विभाग) यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी" यांचा समावेश करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने "सहसंचालक रुग्णालये, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई" यांच्या नावाची शिफारस केली आहे. त्यानुसार "सहसंचालक रुग्णालये, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई" यांचा "सदस्य" म्हणून समावेश करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा सांकेतांक २०१९०२२६१२१३३२६७१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Sanjay Vithoba Kalbhor

Digitally signed by Sanjay Vithoba Kalbhor
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f38e777689de3b7f0254b419127daa9612b470f287aa6310645bf8f39ddb6811, serialNumber=df8236826d559ff6f7f76f1d6d59c70c92e9c010f48017078d824be6d2b5b8d1, cn=Sanjay Vithoba Kalbhor
Date: 2019.02.27 10:47:48 +05'30'

(संजय काळभोर)
कार्यासन अधिकारी.

प्रत,

१. .मा.राज्यपाल यांचे सचिव (पत्राने)
२. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय,मंत्रालय,मुंबई
३. मा.मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,
४. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, अ-६, मंत्रालय समोर, नरिमन पॉईट, मुंबई,
५. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन, मुंबई,
६. मा.राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
७. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

८. प्रधान सचिव (कामगार), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई-३२,
९. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहाय्यक, मुंबई,-३२,
१०. प्रधान सचिव (सार्वजनिक आरोग्य विभाग) मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,
११. धर्मादाय आयुक्त,जर्नमेंट हाऊस, ३ रा मजला,धर्मादाय आयुक्त, बिल्डींग समोर, डॉ.ॲनीबेजेंट रोड, वरळी, मुंबई-४०० ०१८,
१२. कामगार आयुक्त, कामगार भवन, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा, मुंबई,
१३. सह संचालक, रुग्णालये आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई, आरोग्य भवन,सेंट जॉर्जसेस रुग्णालय आवर, पी.डीमोलो रोड, मुंबई-४०० ००१.
१४. सर्व सह/ उप सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
१६. अध्यक्ष किराणा बाजार व दुकाने मंडळ, मध्यवर्ती सुविधा इमारत, ६ वा मजला, फळे व भाजीपाला मार्केट, तुर्भे, नवी मुंबई
१७. अध्यक्ष, रेल्वे गुडस् क्लिअरींग ॲण्ड फॉरवर्डींग एस्टाब्लिशमेंटर लेबर बोर्ड, मुंबई ८४ अ भरोच सदन, देवजी रतनशी मार्ग, दाणाबंदर, मुंबई-४०० ००९.
१८. अध्यक्ष, माल वाहतुक कामगार मंडळ, बृहन्मुंबई १०२/०३, स्टील चेंबर्स, देवजी रतनशी मार्ग, मुंबई ४०० ००९.
१९. अध्यक्ष, दि क्लिअरींग ॲण्ड फॉरवर्डींग असंरक्षित गोंदी कामगार मंडळ, अे-१, अंबाभवन, देवजी रतनशी मार्ग, मस्जिद रेल्वे स्टेशन (पुर्व), मुंबई-४०० ००९.
२०. अध्यक्ष, धातू व कागद बाजार आणि दुकाने माथाडी कामगार मंडळ, महाराष्ट्र सहकारी ग्राहक भवन, ओसवाल निवास, प्रो.हसनशेख मार्ग, चिंचबंदर, मुंबई-४०० ००९.
२१. अध्यक्ष, मुंबई लोखंड व पोलाद कामगार मंडळ, श्रमजीवी भवन, २४७ बी, बी रोड, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड
२२. अध्यक्ष, मुंबई लोखंड व पोलाद कामगार मंडळ, श्रमजीवी भवन, २४७ बी, बी रोड, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड
२३. उर्वरित अध्यक्ष, सर्व माथाडी मंडळे,
२४. सर्व अवर सचिव /कार्यासन अधिकारी, कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई,
२५. निवड नस्ती (कामगार-५).